पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११-१०-८२ पिंपरी - ४११०१८

४१

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

## सूचना

क्रमांक – नरवि।कावि। ~~२४६~~ २८० ।२०१८

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड शहराची सूधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्रमांक – टीपीएस-१८९३/१२७६/सीआर-१७४/९३/युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर, १९९५ अन्वये मंजूर झालेली असून ती दि. २/११/१९९५ पासून अमलात आली आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली.)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे चिंचवड येथील सर्व्हे क्रमांक २९६पै, मधील सुमारे ७००० चौ.मी. क्षेत्र आरक्षण क्र. २१९ अन्वये " माध्यमिक शाळा ", सर्व्हे क्रमांक १७४पै, मधील सुमारे ४५०० चौ.मी. क्षेत्र आरक्षण क्र. २०९ अन्वये " पोहण्याचा तलाव " व सर्व्हे क्रमांक २८४पै, मधील सुमारे ४००० चौ.मी. क्षेत्र आरक्षण क्र. २३०क अन्वये " प्रसुतीगृह व दवाखाना " या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. ( यापुढे " उक्त जमीन " म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ००६, दिनांक – १९।०८।२०१७ अन्वये पारित केलेल्या ठरावात उक्त विकास योजनेतील उक्त जमीनीतील "माध्यमिक शाळा " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " खेळाचे मैदान ", "पोहण्याचा तलाव " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " व्यापारी केंद व प्रसुतीगृह " व "प्रसुतीगृह व दवाखाना " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " गार्डन " असे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ फेरबदलाची कार्यवाही करण्यासंबंधी विषय असून त्यास मान्यता प्रदान केली आहे. ( यापुढे "उक्त ठरावातील विषय" म्हणून संबोधित केलेला .)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमीनीमधील आ.क्र. २१९ "माध्यमिक शाळा " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " खेळाचे मैदान ", आ.क्र. २०९ "पोहण्याचा तलाव " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " व्यापारी केंद्र व प्रसुतीगृह " व आ.क्र. २३०क "प्रसुतीगृह व दवाखाना " या आरक्षणांचे प्रयोजन बदलून " गार्डन " असे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ फेरबदलाची कार्यवाही उक्त ठरावातील विषयानुसार करण्याचे योजिले आहे.

( यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेख केलेला .)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – १८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती । सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – १८ यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मुदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या हरकती । सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर केला जाईल.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थापना ११-१०-८२
पिंपरी - ४११०१८

( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८

ठिकाण- पिंपरी, पुणे – १८.
दिनांक - 30 ।०७।२०१८

(टिपचना – सदर सूचना व फेरबदल दर्शक नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in) या संकेत स्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

Modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966

NOTICE

No. TPS/WS/ ~~261~~ 280/2018

Whereas, the revised Development Plan for Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1893/1276/CR-174/93/UD-13, dated 18th September, 1995 and which came into force from 2/11/1995. ( hereinafter referred to as the said Development Plan. )

And whereas, in the said Development Plan land from Chinchwad village bearing S.No. 296 (P) admeasuring about 7000 sq.m. has been reserved for " Secondary School" vide Reservation No. 219, from S.No. 174(P) land admeasuring about 4500 sq.m. has been reserved for " Swimming Pool" vide Reservation No. 209, & from S.No. 284 (P) land admeasuring about 4000 sq.m. has been reserved for " Maternity Home & Dispensary" vide Reservation No. 230 C, ( hereinafter refer to as the "said Land").

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide resolution No. 006, date- 19/08/2017 to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharastra Regional and Town Planning Act, 1966, in the said Development Plan to redesignate the reservations of "Secondary School" to "Play Ground", "Swimming Pool" to "Shopping Center Cum Maternity Home" & "Maternity Home & Dispensary" to "Garden" from the said Land. ( hereinafter referred to as the "said subject of Resolution".)

And whereas, the Municipal corporation now intends to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to redesignate the Reservations Site No. 219, "Secondary School" to "Play Ground", Site No. 219, "Swimming Pool" to "Shopping Center Cum Maternity Home" & Site No 230 C, "Maternity Home & Dispensary" to "Garden". as per the said subject of Resolution in the said Development Plan ". ( hereinafter referred to as the "said Modification".)

And therefore, copy of said Modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune – 411 018.

44

Any person having any suggestions and / or objections regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune – 411018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government .

The suggestions and/or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to the Government for sanction.

Pimpri Chinchwad Municipal Corporation
Ested
11-10-1982
Pimpri-18

Pimpri,
Date- 30/07/2018

(Shravan Hardikar)
Commissioner
Pimpri Chinchwad Municipal Corporation
Pimpri,Pune-18.

(Note: The said Notice & Plan showing Modification proposal is also available on the web site of P.C.M.C - - www.pcmcindia.gov.in)